<u>सं. फौ. ख. क्र. ४००/२०१६</u>                    निशाणी ३८

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – प्रविण श्रीराम मोरे

वय – ३४ वर्षे,                                व्यवसाय – पोलीस उप निरीक्षक, पो.स्टे. लोणी टाकळी, अमरावती ग्रामीण

पत्ता – रा. लोणी, ता. नांदगाव खांडेश्वर, जि. अमरावती

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१.          मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१५ ते २०२१ या कालावधीमध्ये पो.कॉ. म्हणून कार्यरत होतो. दि.२७.०५.२०१६ रोजी मी व दादाराव लिखार उरळ टाऊन बिट येथे गस्त घालत असताना संध्या. ६ वा. सुमारास आमचे बिट अंमलदार श्री. लिखार यांना गुप्त बातमी मिळाली की, ग्राम गायगाव येथे जावेद खान गुल खान पठाण याने त्याच्या ग्राम गायगाव येथे त्याचे राहते घरी अवैध रॉकेल साठा करुन ठेवलेला आहे. सदर माहिती मिळाल्यानंतर श्री. लिखार यांनी उरळ पो.स्टे. येथे त्याबाबतची माहिती दिली. त्यानंतर मी व लिखार मेजर असे सदर बातमीची शहानिशा करण्याकरीता ग्राम गायगाव येथे बस स्टॅन्डवर गेलो त्या ठिकाणी सदर छाप्याकरीता दोन पंचांना पाचारण करुन पंच म्हणून हजर राहण्यास सांगितले. त्यानंतर मी, अंमलदार श्री. लिखार व दोन पंच यांचे समवेत जावेद खान गुल खान पठाण याचे घरासमोर गेलो. आम्ही नेलेले वाहन हे त्याच्या घराच्या समोर थांबविले तेथून आम्ही पायी चालत त्याच्या घरामध्ये गेलो. त्या ठिकाणी एक इसम मिळून आला त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव  जावेद खान गुल खान पठाण, रा गायगाव असे सांगितले. आम्ही त्यास आमची ओळख करुन दिली व तेथे येण्याचे कारण सांगितले. त्याच्या घरामध्ये दोन खोल्या होत्या त्यापैकी पश्चिम दिशेकडे असणाऱ्या खोलीची पाहणी आम्ही केली असता तेथे आम्हाला ३५ लि. क्षमतेच्या ३ प्लॅस्टीक कॅन मिळून आल्या. सदर कॅनचे पंचासमक्ष झाकण उघडून पाहणी केली असता त्यामध्ये निळसर रंगाचे द्रव्य दिसून आले व त्याचा वास रॉकेल सारखा आला. सदर तीन कॅनमध्ये एकुण अंदाजे ८५ लि. रॉकेल मिळून आले. सदर प्लॅस्टीकच्या तीन कॅनमधून ३ बाटल्यामध्ये ७५० मिली द्रव्य काढून घेवून ते दोन पंचांच्या सहीचे तसेच श्री. लिखार, आरोपी यांच्या सहीच्या लेबल लावून सदरच्या तीन काचेच्या बाटल्या लाखेच्या सहाय्याने सिलबंद केल्या. मिळुन आलेल्या मुद्देमालाचा दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा केला तसेच घटनास्थळाचा घटनास्थळ पंचनामा केला.

२. सदर इसमाकडे श्री. लिखार यांनी रॉकेल विक्रीचा परवाना आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली असता त्याने त्याच्याकडे रॉकेल विक्रीचा परवाना नसल्याचे सांगितले. आम्ही सदर इसमास मुद्देमालासह घेवून उरळ पो.स्टे. येथे गेलो. त्यानंतर श्री. लिखार यांनी आरोपी विरुध्द जिवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत फिर्याद दाखल केली. सदर घटनेबाबत तपासिक अधिकारी यांनी माझी चौकशी केली होती. मी आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात उपस्थित नाहीत, त्याच्या ओळखीविषयी त्यांच्या वकीलांमार्फत कोणताही वाद उपस्थीत नसल्याचे सांगितले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजूबाजूला लोकांची वरदळ असून लोकांची लोकवस्ती आहे. ज्या घरातून मुद्देमाल मिळून आला त्या घराच्या मालकीबाबत श्री. लिखार यांनी माझ्यासमक्ष चौकशी केली होती अथवा नाही, हे मला आता आठवत नाही. घटनास्थळ व जप्ती पंचांना श्री. लिखार यांनी लेखी नोटीस दिली होती अथवा नाही, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर छाप्यामध्ये हजर नसल्यामुळे मला पंचांना नोटीस दिली होती अथवा नाही, हे आता आठवत नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही गस्त अथवा छापा टाकण्याकरीता जातो तेव्हा स्टेशन डायरीला तशी नोंद करतो. आम्ही सदर छापा टाकण्याकरीता गेलो त्यावेळी सदर इसमाच्या ओळखीबाबत काही कागदपत्र पाहिले होते अथवा नाही हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– १३.११.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.11.13 14:55:31 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | १३/११/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १३/११/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १३/११/२०२५ |